# समाजभूषण बाबूराव उर्फ अप्पासाहेब जेधे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पुणे २

**प्रथम सत्र परिक्षा – २०१७–२०१८**

**विषय – मराठी (यशोगाथा)**

**वेळ – २ तास**

**प्रथम वर्ष वाणिज्य** **गुण – ६०**

---

**सूचना :– १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**

**२) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.**

**प्र.१ कोणत्याही एका विषयावर ५०० शब्दांत निबंध लिहा.** **१०**

१) आजची प्रसारमाध्यमे
२) विज्ञान आणि अंधश्रद्धा
३) स्वच्छ भारत, समृद्ध भारत
४) नाती हरवत चाललेला समाज

**प्र.२ खालीलपैकी दहा प्रश्नांची उत्तरे २० शब्दांत लिहा.** **१०**

१) डॉ. श्रीराम लागू यांच्या गाजलेल्या चित्रपटांची नावे लिहा.
२) लता मंगेशकर यांना हिंदुस्थानी शास्त्रोक्त संगीताचे धडे कोणी दिले ?
३) दिल्लीतील कोणत्या विद्यापीठात डॉ. राम ताकवले कुलगुरू होते ?
४) डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी उपेक्षित, गरीब यांना कोणता संदेश दिला ?
५) डॉ. ह. वि. सरदेसाई यांनी कोणकोणत्या माध्यमातून समाजप्रबोधन केले ?
६) ‘परम’ महासंगणकाचे जनक कोण ते लिहा.
७) आत्मसंतुलनमध्ये कोणकोणत्या प्रकारचे उत्पादन तयार केले जाते ?
८) सिंधुताई सपकाळ यांना लहानपणी कोणत्या नावाने हाक मारत असत ?
९) हुकमीचंद चोरडिया यांच्या प्रविण मसाल्याची दोन वैशिष्ट्ये लिहा.
१०) फ्रान्सिस दिब्रिटो यांच्या मनात धर्मगुरू होण्याची इच्छा कोणामुळे निर्माण झाली ?
११) डी. एस. कुलकर्णी यांनी लहानपणी मित्रांसमवेत कोणत्या वस्तूंची विक्री केली ?
१२) शतकांचे शतक करणारा क्रिकेटपटू कोण ते लिहा ?

**प्र.३ खालीलपैकी <u>चार</u> प्रश्नांची ५० शब्दांत उत्तरे लिहा.** **२०**

१) डॉ. श्रीराम लागू यांचे अंधश्रद्धाविषयक विचार लिहा.
२) डॉ. ह. वि. सरदेसाई यांनी वैद्यकीय सेवेमध्ये कोणत्या गोष्टी जाणीवपूर्वक जोपासल्या ?
३) ‘आत्मसंतुलन’ मध्ये वृक्षदेवतेला कोणती विनवणी केली जाते ?
४) सिंधूताई सपकाळ यांच्या सामाजिक कार्याचे वर्णन करा.
५) वसई येथील ब्राम्हण आळीचे वर्णन करा.
६) डी. एस. कुलकर्णी यांचे सामाजिक कार्य थोडक्यात लिहा.

**प्र.४ खालीलपैकी <u>दोन</u> प्रश्नांची १५० शब्दांत उत्तरे लिहा.** **२०**

१) डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे व्यक्तिचित्र रेखाटा.
२) ‘डॉ. राम ताकवले हे एक विचारवंत शिक्षणमहर्षी आहेत’ या विधानाचा परामर्श घ्या.
३) डी. एस. कुलकर्णी यांच्या यशस्वी उद्योगाचे वर्णन करा.
४) धर्मगुरू फ्रान्सिस दिब्रिटो यांचे व्यक्तिचित्र रेखाटा.

✠ ✠ ✠